दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

• वर्ष १६ वे • अंक २४३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.२८ नोव्हेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम माध्यम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# नव्या स्ट्रेनचा धोका: महाराष्ट्रात पुन्हा निर्बंध जारी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

करोनाचा नवा ओमिक्रॉन स्ट्रेन आढळल्यानंतर दक्षिण आफ्रिका, बोत्स्वाना आणि हाँगकाँग येथून येणाऱ्या प्रवाशांच्या काटेकोर तपासणीचे निर्देश केंद्र सरकारने दिले असतानाच महाराष्ट्र सरकारनेही आज मोठे पाऊल उचलत कोविड नियम अधिक कडक केले आहेत.

राज्य सरकारने आज प्रवास व अन्य बाबींसाठी नवी नियमावली जारी केली आहे.

कोविडच्या दुसऱ्या लाटेत महाराष्ट्रात रुग्णसंख्येचा मोठा उद्रेक पाहायला मिळाला होता. राज्य दुसऱ्या लाटेतून सावरत असतानाच कोविडच्या नव्या स्ट्रेनचा धोका निर्माण झाला असून ही बाब लक्षात घेत राज्य सरकार सतर्क झालं आहे. त्यानुसार काही महत्त्वाचे निर्णय घेत नियमावली निश्चित करण्यात आली आहे. विदेशातून राज्यात येणाऱ्या सर्व प्रवाशांना आता केंद्र सरकारचे निर्देश लागू राहणार आहेत. तर राज्यांतर्गत प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कोविडवरील लसचे दोन्ही डोस म्हणजेच संपूर्ण लसीकरण आवश्यक असेल. तसे नसल्यास संबधित प्रवाशाला ७२ तासांपूर्वी केलेल्या आरटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह अहवाल सोबत ठेवावा लागणार आहे.

संपूर्ण लसीकरण झाले असलेल्या नागरिकांनाच सवलती देण्याचे धोरण पुन्हा एकदा राज्य सरकारने अवलंबले आहे. त्यानुसार आता कार्यालये, दुकाने, मॉल तसेच कोणत्याही समारंभात सहभागी व्हायचे असल्यास संपूर्ण लसीकरणाची अट घालण्यात आली आहे.

महत्त्वाचे म्हणजे सर्व प्रकारच्या सार्वजनिक वाहतूक सेवांमध्येही आता संपूर्ण लसीकरण झाले असेल तरच प्रवेश हे सूत्र ठरवण्यात आले आहे. राज्य सरकारने दिलेला युनिव्हर्सल ट्रॅव्हल पास किंवा कोविन प्रमाणपत्र (वैध ओळखपत्रासह) पुरावा म्हणून दाखवावा लागेल. १८ वर्षांखालील मुलांना शाळेचं ओळखपत्र दाखवून प्रवेश दिला जाईल. जी व्यक्ती वैद्यकीय कारणास्तव लस घेऊ शकली नाही त्याला त्याबाबतची अधिकृत कागदपत्रे दाखवल्यावर प्रवेश मिळू शकेल.

- **चित्रपटगृह, सभागृह, थीएटर, लग्नाचा हॉल अशा ठिकाणी एकूण क्षमतेच्या ५० टक्के लोकांनाच उपस्थित राहण्याची परवानगी असेल तर लॉन्स, मैदाने अशा ठिकाणी लग्न वा इतर समारंभ करायचा असल्यास एकूण क्षमतेच्या २५ टक्के उपस्थितीचे बंधन असणार आहे.**
- **टॅक्सी, खासगी कार यांमध्ये प्रवास करतानाही कोविड नियमांचे पालन बंधनकारक असेल.**
- **कोविड नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधितावर ५०० रुपये दंड आकारण्यात येईल. सार्वजनिक सेवेतील बसचा चालक अथवा वाहक नियम मोडत असेल तर त्यालाही हा दंड लागू असेल.**
- **एखाद्या बसमधून प्रवास करणारा प्रवासी नियम पाळत नसेल तर संबंधित वाहनाच्या मालकावर १० हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे.**

# पिकअप दिंडीत घुसल्याने भीषण अपघात; ४ महिलांचा मृत्यू, 20 पेक्षा जास्त जखमी

**दै.रायगड नगरी । वडगाव/मावळ**

आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यानिमित्त माऊली कृपा चॅरिटेबल ट्रस्ट पायी दिंडी जात असताना शनिवारी (दि.२७) सकाळी ७ वा. साते फाटा मुंबई-पुणे महामार्गावर भीषण अपघात झाला. या अपघातात मालवाहतूक पिकअप जोरात दिंडीत घुसल्याने २४ जण जखमी तर चार महिलांचा मृत्यू झाला आहे. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस, रुग्णवाहिका व स्थानिक नागरिकांनी जखमींना औषधोपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. अपघाताची माहिती मिळताच मावळचे आमदार सुनील शेळके यांनीही दिंडीतील भाविक व जखमींना मदत पाठविली आहे.

पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या आदेशानुसार अप्पर पोलीस अधीक्षक मित्तेश घट्टे, उप विभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र पाटील व पोलीस निरीक्षक विलास भोसले आदींनी घटनास्थळी व जखमींची विचारपूस केली. जयश्री आत्माराम पवार (वय ५४रा. कर्जत, भूतीवली) सविता वाळकू यरम (वय ५८रा. खालापूर, उंबरे ) आणि विमल चोरगे ( वय ५० रा. खालापूर), संगीता वसंत शिंदे (वय ५६ रा. कर्जत ता. खालापूर) या



चार महिलांचा अपघातात मृत्यू झाला आहे.

जखमींची नावे पुढील प्रमाणे: मंदा बाबू वाघमारे वय २५ रा. उंबरे, वनिता बबन वाघमारे वय ३५, रा. उंबरे, रंजना गणेश वाघमारे वय ३२ रा. पाली, राजेश्री राजेश सावंत वय ३५, रा. खोपोली, सुरेखा तुळशीराम करनुक वय ६०, रा. बीड खुर्द, वंदना राम करनुक वय ६० रा. बीड खुर्द, माणिक बळीराम करनुक वय ८०, रा. बीड खुर्द, दिव्या दीपक चांदुरकर वय ४२ रा. उरण, आशा अनंता साबळे वय ५० रा. वडप, शारदा चंद्रकांत अहिर वय ६० रा. उंबरे,

सुमित्राबाई बबन चोरघे वय ६५ रा. बीड खुर्द, पुष्पांजली दिलीप करनुक वय ६५ ,रा. खोपोली, सुभद्रा सीताराम शिंदे वय ७० रा. खोपोली, बेबी रामदास सावंत वय ४९ रा. कर्जत, सुनंदा सदाशिव चोरघे वय ५०, रा. बीड खुर्द, रंजना अशोक करनुक वय ५५ रा. बीड खुर्द, राधिका बाळकृष्ण भगत वय ४० रा. बीड खुर्द, पुष्पा गणपत पालकर वय ४० रा. बीड खुर्द, अनुसया बंडू जाधव वय ४५ रा. उंबरे, शोभा चंद्रकांत सावंत वय ५५ रा. साळवट, अनुसया मधुकर जाधव वय ५५, रा.बीड खुर्द, बेबी लक्ष्मण करनुक वय ५६ रा. बीड खुर्द, ताई बबन वाघमारे वय ५० रा. बीड खुर्द आदी जखमी असून तालुका खालापूर जि. रायगड येथील रहिवासी आहेत.

अपघातातील जखमींना कामशेत महावीर हॉस्पिटल, बढे हॉस्पिटल, कान्हे येथील शासकीय ग्रामीण रुग्णालयात, सोमाटणे येथील पवना हॉस्पिटल मध्ये औषधोपचारासाठी

.../२

# जेलिफिशमुळे श्रीवर्धनची मासेमारी संकटात ; सहा बंदरातील मासेमारी धोक्यात



**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन समुद्रकिनारी जेलिफिशचे थैमान सुरू झाले आहे. येथील कोळीबांधवांना मासेमारीत घातक जेलिफिशची वाढ झाल्याने मासळी मिळणे मुश्किल झाले आहे. परिणामी मच्छीमार संकटात सापडला आहेत.

तालुक्यातील समुद्रकिनारी दिघी, आदगाव, दिवेआगर, भरडखोल, जीवना, बागमांडला अशी मासेमारीसाठी प्रसिद्ध बंदर आहेत. कोकणातील पर्यटनासाठी नारळ - सुपारीच्या बागा, निसर्ग सौंदर्याने नटलेली गावे यासोबतच रोजगार मिळवून देणारी पारंपारिक मासेमारी महत्वाची ठरते. मात्र, सद्या मोठया प्रमाणात समुद्रात जेलिफिशचे संकट वाढल्याने मासेमारी समस्यांच्या जाळ्यात अडकली आहे.

या गावातील अनेक स्थानिक या समुद्रामध्ये पारंपरिक पद्धतीने किंवा छोट्या होडीने मच्छीमारी करून उपजीविका करतात. दरम्यान वातावरणातील बदल, अवेळी वादळी पावसाची हजेरी असे अनेक संकटांतून सामोरे जाऊन मासेमारी दुष्काळ सहन करत असताना त्यामध्ये आता विषारी

.../२

## संक्षिप्त...

### मुंबई पुन्हा हादरली! २० वर्षीय तरुणीची बलात्कार करुन हत्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई पुन्हा एकदा बलात्काराच्या घटनेने हादरली आहे. मुंबईच्या कुर्ला परिसरात असलेल्या एचडीआयले कंपाउंडमधील एका बंद इमारतीच्या टेरेसवर २० वर्षीय तरुणीचा मृतदेह सापडला आहे. या तरुणीवर बलात्कार करुन नंतर तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. बंद इमारतीच्या टेरेसवर लिफ्टच्या बाजूला तरुणीचा मृतदेह सापडल्याने एकच खळबळ माजली आहे. तरुणीची ओळख अद्याप पटली नसून पोलिस आणि गुन्हे शाखेच्या पथकांनी तपास सुरु केला आहे. कुर्ला परिसरातील एचडीआयएल कंपाउंडमध्ये या तरुणीचा मृतदेह सापडला. एका बंद पडलेल्या इमारतीच्या टेरेसवर मृतदेह सापडल्यानंतर तातडीने पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर मृतदेह राजावडी रुग्णालयात पाठवण्यात आला. डॉक्टरांच्या अहवालानंतर पोलिसांनी अज्ञात इसमाविरोधात बलात्कार आणि हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. तरुणीची ओळख अद्याप पटलेली नसून आसपासच्या पोलिस स्थानकात बेपत्ता असल्याच्या काही तक्रारी आल्या आहेत का, याची चौकशी पोलीस करत आहेत. काही तरुण एचडीआयएल कंपाऊंडमधील बंद असलेल्या इमारतीवर इन्स्टाग्रामसाठी व्हिडिओ शूट करण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांनी टेरेसवर तरुणीचा मृतदेह आढळला. त्यावेळी त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

# लहान मुलांच्या आजारावरील उपचारांसाठी हे सेमिनार उपयुक्त : ना.आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यातील तज्ञ डॉक्टर सेमिनार च्या माध्यमातून एकत्र येऊन बालक रोगांविषयी चर्चा करीत आहे याचा लहान मुलांवरील आजारांवर उपचार करण्यासाठी निश्चितच लाभ होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी आज मुरुड येथे केले.

मुरुड तालुक्यातील काशीद येथील प्रकृती रेसॉर्ट येथे राज्यातील विविध तज्ञ डॉक्टरांचे तीन दिवसीय सेमिनार सुरू आहे, या सेमिनारच्या आजच्या शेवटच्या दिवशी प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी डॉ. वाय.के. आमडेकर, डॉ.उदय बोधनकर, डॉ.राजू शहा, डॉ.नितीन शहा, डॉ.विजय येवले, डॉ.बकुळ पारेख, डॉ. जयंत उपाध्येय,डॉ. राजीव धामणकर, डॉ. दाभाडकर, डॉ.महेश मोहिते, आदिंसह इतर डॉक्टरही उपस्थित होते.

पालकमंत्री आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, हे सेमिनार राज्यातील लहान बालकांच्या विविध आजारांवर उपचार करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शक ठरणार असून याद्वारे लहान बालकांना होणाऱ्या विविध रोगांवर एकच उपचार पद्धती अंमलात आणता येईल. या माध्यमातून उपस्थित डॉक्टरांचा अनुभव व परीक्षण याद्वारे लहान मुलांना चांगले उपचार मिळण्यास मदत होईल.

त्या पुढे म्हणाल्या की, करोनाच्या कोणत्याही लाटेशी सामना करण्याची आमची तयारी आहे. परंतु लहान मुलांना करोना झाल्यास अद्ययावत व तांत्रिक पद्धतीने त्या बालकांवर कसे उपचार करता येतील, यासाठी या सेमिनारसाठी उपस्थित तज्ञ डॉक्टरांनी आपले अनुभव पणाला लावले आहेत. या अनुभवी डॉक्टरांच्या ज्ञानाचा ग्रामीण भागातील डॉक्टरांनादेखील उपयोग व्हायला हवा. त्यामुळे ग्रामीण भागातील लहान मुलांचेही आरोग्य सदृढ राहण्यास महत्वपूर्ण योगदान मिळेल.

रायगड जिल्ह्याचा हा गौरव आहे की, प्रशिक्षित व अनुभवी डॉक्टर यांचे तीन दिवसीय सेमिनार या जिल्ह्यात घेण्यात आले, लहान मुलांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी हा एक चांगला उपक्रम येथे आयोजित करण्यात आला

.../२

# आगरी समाजासाठी प्रतीक जुईकर हे प्रतिबिंब ठरले आहेत : कपिल पाटील

**दै.रायगड नगरी । कर्जत**

आगरी समाजाला इतिहास असून आठ कोटी आगरी देशात अल्पसंख्याक ठरणार नाही आणि हा समाज अनेक मतदारसंघात बदल घडविण्याची ताकद आहे असे ठाम मत केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी व्यक्त केले.कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील पहिले आयएएस प्रतीक जुईकर आणि आगरी समाजातील २२० विद्यार्थ्यांचा सत्कार केंद्रीय मंत्री यांच्या हस्ते करण्यात आले.



नकर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या वतीने नेरळ येथील हुतात्मा हिराजी पाटील सामाजिक सभागृहात विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित केला होता.केंद्रीय पंचायत राज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते रायगड जिल्ह्यातील पहिले थेट आयएएस अधिकारी प्रतीक जुईकर, शूरवीर रेल्वे कर्मचारी मयूर शेळके यांचा नागरी सन्मान करण्यात आला. तर कर्जत तालुका आगरी समाज भूषण पुरस्कार यावर्षी इतिहास संशोधक वसंतराव कोळंबे यांना सन्मानचिन्ह आणि स्कुल बॅग भेट देण्यात आली.त्यावेळी व्यासपीठावर कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष सावळाराम जाधव, रायगड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष सुरेश टोकरे, संघटनेचे उपाध्यक्ष केशव मुने, सचिव शिवराम बदे, मंगेश म्हसकर, स्वातंत्र्यसैनिक यांचे नातेवाईक शरद भगत, विठ्ठल पाटील, रवी मसणे, आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात कर्जत तालुक्यातील आगरी समाजातील माध्यमिक आणि कनिष्ठ महाविद्यालय मधील दहावी आणि बारावी मधील ८० टक्के हुन अधिक गुण मिळविणाऱ्या २२० विद्यार्थी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.तर आंतरराष्ट्रीय बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये स्थान मिळविणारे ऍड गजानन डुकरे,तसेच देवराज गजानन डुकरे यांचा आणि शिष्यवृत्ती स्पर्धेत पारितोषिक मिळविणारे यांना सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय पंचायत राज खात्याचे राज्यमंत्री कपिल पाटील यांनी यावेळी बोलताना आगरी समाजाला हा जिव्हाळा जपणार समाज आहे

.../२

# पनवेल-प्रयागराज सुपर फास्ट रेल्वे सेवा २९ नोव्हेंबर पासून सुरू होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकणातल्या भाविकांची आणि समस्य वारकरी संप्रदायाची ह्या गाडी संबंधीची मागणी पनवेल प्रवासी संघाकडे वारंवार होत होती. नुकतीच प्रवासी सेवा सुविधा विषयाची केंद्रिय संसदीय समितीने पनवेल रेल्वे स्थानकाला भेट दिली असता, केंद्रिय समितीचे खासदार कृष्णदास यांची पनवेल प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ.भक्तिकुमार दवे यांनी भेट घेऊन या संबंधीची चर्चा करून लेखी निवेदन दिल्याप्रमाणे ही गाडी सध्या आठवडयातून एकदा २९ नोव्हेंबर २०२१ पासून प्रायोगिक तत्वावर सुरू होत आहे तसेच ही गाडी पूर्णपणे आरक्षित असून पनवेल स्थानकामधून सोमवारी रात्री २२:३० वा.सुटेल व प्रयागराज येथे बुधवारी पहाटे ०३:३५ ला पोहचेल. या गाडीचा नंबर ०१९०४ असा आहे. ही गाडी परतीच्या प्रवासासाठी प्रयागराजहून प्रत्येक रविवारी संध्याकाळी ०५:२५ वा सुटेल. या गाडीचा नंबर ०१९०३ असा आहे. या आरक्षित गाडीचे आरक्षण २६ नोव्हेंबर पासून सर्व आरक्षण केंद्रावरून तसेच द्धद्धद्ध.रिच्तच.चे.नि या वेबसाईटवरही करता येईल.

या संबंधी बोलताना प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ.भक्तिकुमार दवे म्हणाले की, ह्या प्रायोगिक सेवेचा कार्यकाळ वाढविल्यास या रेल सेवेसंबंधी अधिक चांगली निरीक्षणे नोंदविता येतील आणि ही सेवा कायमस्वरूपी ठेवणे शक्य होईल. ही सुपरफास्ट गाडी कल्याण, नाशीक रोड, भुसावळ, इटारसी, भोपाळ, बीना, ललितपूर, टीकमगढ, खरगपूर, महाराजाछत्रसाल स्टेशन-छतरपूर, खजुराहो, महूबा, बांदा, चित्रकुट धाम, मनिकपूर, शंकरगढ, नैनी या स्थानकांवर थांबेल.

या गाडीला १ द्वितीय वातानुकूलित,

.../२

# आरक्षणाची अवघड वाट

देशात पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी 'राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा' (नीट) घेण्यात येते. या परीक्षेतील गुणानुक्रमानुसार देशभरातील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळू शकतो. या परीक्षेमध्ये २७ टक्के जागा इतर मागासवर्गातील मुले (ओबीसी) आणि दहा टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बळ; पण जातीच्या आधारावर आरक्षणात समावेश नसणाऱ्या वर्गासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी आवश्यक ती घटनादुरुस्तीही करण्यात आली होती. अपेक्षेप्रमाणे हा वाद सर्वोच्च न्यायालयात गेला आहे. त्यातील एक मुद्दा, देशातील ओबीसींची नेमकी संख्या माहीत नसताना या जागांमधील केंद्रीय कोट्यात २७ टक्के आरक्षण कशाच्या आधारावर देण्यात येत आहे, हा आहे. त्याचा निकाल लागलेला नाही. दुसरा मुद्दा, केंद्र सरकारने आर्थिक दुर्बळ घटक ठरविताना, पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा आठ लाख रुपये धरली आहे. याही निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात आल्या असून, न्या. धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने 'ही मर्यादा योग्य आहे का' अशी विचारणा केंद्राकडे केली आहे. आत्ताचा मुद्दा पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणापुरता मर्यादित असला, तरी देशातील एकूण आरक्षणाचे धोरण आणि त्यातील काळानुरूप बदल यांची व्यापक चर्चा सर्वोच्च न्यायालयात पुढील सुनावणीत होऊ शकते. हीच चर्चा कोणताही अभिनिवेश किंवा पूर्वग्रह न आणता इतरही माध्यमांमधून राष्ट्रीय पातळीवर करण्याची गरज आहे. केंद्र सरकारने केलेली घटनादुरुस्ती आणि न्यायालयीन सुनावणी यांच्याकडे त्या दृष्टीने; तसेच गंभीरपणे पाहण्याची आवश्यकता आहे. ही सुनावणी चालू असताना न्या. सूर्यकांत यांनी अशी टिपणी केली, की आर्थिकदृष्ट्या दुर्बळ समाजघटकांसाठी आरक्षणाची तरतूद करणे, हे केंद्र सरकारचे पुरोगामी पाऊल आहे. याचिकादारांचे अनुभवी व ज्येष्ठ वकील अरविंद दातार यांनी न्यायमूर्तींच्या या निरीक्षणास आक्षेप घेतला नाही; मात्र त्यांनी वार्षिक आठ लाख, म्हणजे महिन्याला जवळपास ७० हजार रुपये मिळविणारे कुटुंब दुर्बळ घटकांत मोडते का, असा प्रश्न उपस्थित केला. तो योग्य आहे आणि केंद्र सरकारनेही या मर्यादेचा चार आठवड्यांत विचार करण्याची तयारी दाखविली आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी केंद्र सरकारच्या ज्या पावलास 'पुरोगामी' म्हटले, त्यात 'कथित उच्चवर्णीय; पण दुर्बळ' अशा घटकांचा विचार होतो आहे. याच दृष्टिकोनाची दुसरी बाजू, 'आर्थिकदृष्ट्या सबळ; पण कथित निम्नवर्गीय' अशी आहे. हा मुद्दा याहून खोलात नेला, तर स्वातंत्र्यानंतर ज्या ज्या कुटुंबांना घटनात्मक आरक्षणाचा लाभ शिक्षण किंवा नोकरीसाठी मिळाला आहे; त्यांच्या पुढील पिढ्यांनी तो लाभ आपल्याच जाती-जमातींमधील इतर कुटुंबांसाठी मोकळा करून आरक्षणाच्या चक्रातून बाहेर पडावे किंवा कसे, हा आहे. हा विषय राजकीय पक्षांना कितीही गैरसोयीचा किंवा अप्रिय वाटला, तरी त्याची निकोप आणि गुणात्मक चर्चा करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सर्वोच्च न्यायालयासमोर आलेल्या याचिकांचा परीघ हा मर्यादित आणि पदव्युत्तर वैद्यकीय प्रवेशाच्या परीक्षेसाठी अर्थदुर्बळ कोणास म्हणावे, या प्रश्नापुरताच आहे; मात्र सुनावणीमधून इतरही अनेक मुद्दे पुढे येणार आहेत. केंद्रीय वैद्यकीय महाविद्यालये; तसेच लष्करी वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर प्रवेश यंदा या याचिकांमुळे रखडले आहेत. विविध राज्यांमधील ज्या मुलांना या लष्करी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश हवा आहे, त्यांचीही अडचण झाली आहे; त्यामुळेच विधिज्ञ अरविंद दातार यांनी 'हे अभ्यासवर्ष सुरू होण्यास कमालीचा विलंब होत असल्याने, केंद्र सरकारने आता जुन्या नियमावलीनुसारच प्रवेश करावेत आणि पुढच्या वर्षी नवी पद्धत लागू करावी,' अशी सूचना सुनावणी चालू असताना केली. न्यायमूर्ती चंद्रचूड यांनीही ही सूचना उचलून धरली असली, तरी केंद्र सरकारच्या वकिलांनी ती अद्याप स्वीकारलेली नाही. केंद्र सरकार याकडे केवळ नियमांच्या नव्हे, तर राजकारणाच्या अंगानेही बघत असणार; त्यामुळे संसदेत विधेयक मांडून घेतलेला निर्णय सरकार मागे घेण्याची शक्यता फारच कमी आहे. या निर्णयामुळे यंदा ओबीसी वर्गातील चार हजार मुलांचा; तसेच अर्थदुर्बळ घटकातील दीड हजार मुलांचा फायदा होऊ शकतो. शैक्षणिक वर्ष कितीही लांबले, तरी या साडेपाच हजार मुलांचे नुकसान का होऊ द्यायचे, या प्रश्नाचा विचार सरकारला करावा लागेल. अशा न्यायालयीन याचिकांवरील दूरगामी मार्ग म्हणजे, एकंदरीतच अर्थदुर्बळ घटकांसाठी सध्याच्या आरक्षण संरचनेत कसे स्थान निर्माण करायचे आणि देशातील ओबीसींची नेमकी संख्या जाणून घेण्यासाठी कसे प्रयत्न करायचे, याचा विचार सरकारने करावा. तो मोदी सरकार सध्या टाळत आहे. तसे करून चालणार नाही.

## वर्गाच्या बाहेर बसणारी व्यक्ती जगातील सर्वात मोठी राज्यघटना लिहिते हेच सर्व देशवासियांसाठी प्रेरणादायी : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय व लोकशाहीच्या मूलभूत तत्वप्रणालीवर आधारित विज्ञान निष्ठा राज्यघटना महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाला बहाल केला. खडप्राय असलेला देश एकसंघ ठेवण्याची किमया संविधानाने केली. सुरवातीला वर्गाच्या बाहेर बसणारी व्यक्ती जगातील सर्वात मोठी राज्यघटना लिहिते हेच सर्व देशवासियांसाठी प्रेरणादायी आहे.असे प्रतिपादन पाली सुधागड चे तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी केले.

माझे संविधान, माझा अभिमान या उपक्रमा अंतर्गत पालीतील शेठ जे. एन. पालीवाला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात शुक्रवारी (दि.२६) संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी संविधानाची बहुमूल्य माहिती देऊन मौलिक मार्गदर्शन केले.

तहसीलदार दिलीप रायण्णावार म्हणाले की ज्या व्यक्तीला सुरुवातीला शाळेच्या बाहेर बसावे लागले, अशी व्यक्ती जगातील सर्वात मोठी राज्यघटना लिहिते हेच सर्व देशवासियांसाठी प्रेरणादायी आहे. तसेच प्रत्येक नागरिकांनी संविधानातील कलम ५१अ मधील ११ मूलभूत कर्तव्य यांचे पालन करणे गरजेचे आहे असे आवाहन देखील रायण्णावार यांनी केले.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्राध्यापक एम. एस. लिमन यांनी संविधानाचे महत्व अगदी मोजक्या शब्दात विद्यार्थ्यांना समजावले. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ अंजली पुराणिक यांनी विद्यार्थांनी संविधानाचे विचारपूर्वक वाचन करून त्याची स्वतः च्या जीवनात अंमलबजावणी करावे असे आवाहन केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक तहसीलदार दिलीप रायण्णावार, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अंजली पुराणिक, उपप्राचार्य एम. एस. लिमन, राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख एस. एस. बेलवळकर, सर्व विभाग प्रमुख, तसेच प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रा. एस. एस. बेलवलकर, सूत्रसंचालन प्रा. अजित खरोसे तर आभार प्रा. ज्ञानेश्वर मुंडे यांनी केले.




## खरसई येथे शालेय व्यवस्थापन समिती सभेत विविध विषयांवर चर्चा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरसई येथे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले गुणवत्तापूर्ण शिक्षण अभियान अंतर्गत प्राप्त निधीच्या खर्चा संदर्भात व शासन योजना लोकसहभाग यातून आराखड्यातील कामांच्या अंमलबजावणीची तात्काळ सुरुवात करण्यासाठी, आज रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खरसई येथे शालेय व्यवस्थापन समिती व पालक बैठक घेण्यात आली.

बैठकीमध्ये कार्यालयाच्या सूचनेनुसार ३१ डिसेंबर पूर्वी सर्व कामे पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून चर्चा करण्यात आली. तसेच लोक सहभागाबाबत गावातील विविध संघटनेचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक पालक यांच्याशी चर्चा करून लोक सहभाग जमा करण्यास सुरुवात करण्यात आली. तसेच शाळेचा परिसर स्वच्छता, शाळेला आवश्यक भौतिक सुविधा शाळा स्वच्छता गृह, शाळा रंगरंगोटी व बोलक्या भिंती मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धा आयोजित करणे.तसेच शाळा आदर्श करून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा व मुलांचे भविष्य घडविण्याचा निश्चय करण्यात आला. शाळेची पाहणी करण्यात आली.

गुणवतापूर्ण शिक्षण देण्यासाठी आवश्यक शिक्षणविषयक विविध उपक्रमावर सामूहिक चर्चा करण्यात आली.

यावेळी उपस्थित सरपंच व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश मांदाडकर, VSTF तालुका समन्वयक सचिन निकम, मुख्याध्यापक राठोड सर, आगरी समाज अध्यक्ष नामदेव खोत,माजी अध्यक्ष हरीचंद्र कांबळे, तंटामुक्ती अध्यक्ष रामदास कांबळे, ग्राप सदस्य जगदीश खोत, चिंतामणी वेटकोळी, सौ जयश्री मांदारे, हरीचंद्र पाटील, चंद्रकांत म्हात्रे, काशिनाथ माळी, भालचंद्र कंबळे, सौ हेमा पाटील,सौ हर्षला शीतकर, सौ सूचिता पयेर, शिक्षक सानप सर, मडावी सर व इतर मान्यवर उपस्थित होते.

## २८ नोव्हेंबर रोजी जेएनपीटीमध्ये कामगार मेळावा

**दै.रायगड नगरी । उरण**

दिवंगत कामगार नेते शाम म्हात्रे यांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या एकता कॅटलिस्ट या संघटनेच्या ७ व्या वर्धापन दिनानिमित्त उरणमध्ये कामगार प्रकल्पग्रस्त आणि ओबीसी समाजाचे भव्य मेळाव्याचे आयोजन (रविवार) दिनांक २८ नोव्हेंबर २०२१ रोजी दुपारी ३ वाजता उरण मधील जेएनपीटी टाउनशिप च्या मल्टीपर्पज हॉल मध्ये बहुसंख्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तींना नवरत्न कॅटलीस्ट पुरस्काराचे वितरण व ओबीसी/ व्ही जे एन टि जनमोर्चा संघटनेच्या महिला आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी दिवंगत कामगार नेते शाम म्हात्रे यांची कन्या श्रुती म्हात्रे यांची निवड झाल्याने त्यांचा जाहीर सत्कार यावेळी करण्यात येणार आहे. कामगार कायदे आणि चळवळीबाबत तसेच शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.

त्यामुळे जास्तीत जास्त कामगार वर्गांनी, प्रकल्पग्रस्त, शेतकर्यांनी, मच्छीमारांनी या कामगार मेळाव्याला हजर राहण्याचे आवाहन एकता कॅटलीस्ट या संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## पार्वतीबाई नांदगावकर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरातील रोहीदास वाडी येथील पत्रकार श्रीकांत नांदगावकर यांच्या आजी व वाडीतील सर्वांच्या लाडक्या बय पार्वतीबाई महादेव नांदगावकर यांचे गुरू.दि.२५ रोजी रात्री ११वाजता देहावसान झाले.



मृत्यू समयी त्यांचे वय ९१ वर्ष होते. त्यांच्या पाठीमागे १मुलगा, २ मुली, सुना, नाती, नातवंडे, पंतवडे असा फार मोठा परिवार आहे. जुन्या पिढीतील जाणत्या महीला असून त्याकाळच्या प्रतिकूल परिस्थितीत मोठे कुटुंब संभाळून शेती व्यवसाय करून संसार केला सुस्वभावी असल्याने वाडीमध्ये त्यांना बय या नांवानीच ओळखले जात होते. माहेर सासर वाडीतील असल्याने सुपरिचीत व्यवहारी होत्या. वयोमानानुसार गेले दोन महीने किरकोळ आजारी होत्या. त्यांच्या मृत्यूची बातमी समजताच अनेकांनी त्यांच्या पार्थिव देहाचे दर्शन घेतले. त्याच्यां अत्यंयात्रेत विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच पत्रकार बंधू, आप्तवर्ग, इष्टमित्र, परिवार, उपस्थित होते त्यांचे दशविधि क्रिया शनिवार ४/१२/२०२१ रोजी तर बारावे उत्तर कार्य सोमवार दि.६/१२/२०२१ रोजी तळा येथे त्यांच्या रहात्या घरी होणार आहेत.

## मालसई ग्रा.पंचायतीकडून अपंग बांधवांना मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील मालसई ग्रा.पंचायतीच्या वतीने ग्रा. पं.हद्दीतील अपंग बांधवांना फॅनचे वाटप करून मदतीचा हात देण्यात आला आहे. मालसई ग्रा.प.कार्यालयात संपन्न झालल्या या कार्यक्रम प्रसंगी सरपंच रसिका मालुसरे, उपसरपंच योगेश शिंदे, सदस्य कुमार कोल्हटकर, दिनेश कराळे, सरिता गायकर, अस्मिता मानकर, मयुरी तुपकर, कविता शेळके, निलेश मालुसरे, पुजा गायकर, संजय मालुसरे, तंटामुक्त समिती अध्यक्ष घन:श्याम कराळे, ओम साईराम अपंग कल्याणकारी संघटना अध्यक्ष मारुती तुपकर व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रा.पंचायतीचे १५ वित्त आयोगाच्या ५ % निधीतून अपंग बांधवांना सदर फॅनचे वाटप करण्यात आले आहे. या ग्रा. पं.हद्दीत राष्ट्रवादी काँग्रेसचे माध्यमातून विविध प्रकारच्या विकास कामांचा धडाका सुरू असून विविध विकास कामे मार्गी लागली आहेत. तर दरवर्षी या ग्रा. पंचायतीचे माध्यमातून अपंग बांधवांना विविध प्रकारच्या वस्तुंचे वाटप करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर तालुक्यातील अन्य ग्रा.पंचायतींनी देखील अपंग बांधवांना विविध प्रकारच्या माध्यमातून दिलासा मिळवून द्यावा अशाप्रकारचे मनोगत मारूती तुपकर यांनी यावेळी व्यक्त केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## ४ महिलांचा मृत्यू, २० पेक्षा जास्त जखमी

दाखल केले आहे. पोलीस निरीक्षक विलास भोसले यांनी दिलेल्या माहितीनुसार, माऊली कृपा चॅरिटेबल ट्रस्ट पायी दिंडी उंबरे ता. खालापूर ही मंगळवार दि.३० रोजी आळंदी येथे संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्यानिमित्त जात असताना, साते फाटा (ता. मावळ) मुंबई-पुणे महामार्गावर (एम एच १२ एस एक्स ८५६२) क्रमांक टेम्पो चालक राजीव प्रमोद चौधरी वय ३० रा. वाघोली पुणे) यांने भरधाव वेगाने टेम्पो पायी जाणाऱ्या दिंडीतील महिलांच्या अंगावर घालून त्यांना चिरडले.

अपघात इतका भीषण होता की, अपघाताच्या ठिकाणी रक्ताचा सडा सांडला होता. महिलांच्या किंकाळ्या ऐकून परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. घटनास्थळी आमदार सुनील शेळके यांचे बंधू सुधाकर शेळके, सरपंच विजय सातकर, रुपेश गायकवाड, माजी सरपंच संतोष जांभुळकर, पोलीस पाटील शांताराम सातकर, गजानन शिंदे, संदीप कुंभार, पोलीस उप निरीक्षक संतोष चामे, विकास सस्ते, पोलीस कर्मचारी अमोल तावरे, संपत वायळ, आदित्य भोगाडे, गणपत होले, अजय शिंदे आदी उपस्थित होते. आरोपी टेम्पो चालक राजीव चौधरी याला पोलिसांनी तात्काळ अटक केली. या गुन्ह्याचा तपास पोलीस उप निरीक्षक विकास सस्ते करत आहेत.

## जेलिफिशमुळे श्रीवर्धनची मासेमारी संकटात ; सहा बंदरातील मासेमारी धोक्यात

जेलिफिशने परिसरातील मच्छीमार चिंताग्रस्त झालेत.

थंडी हंगामात समुद्रकिनारी जेलिफिशना पोषक वातावरण तयार होऊन त्या किनाऱ्यालगत मोठ्या प्रमाणात स्थलांतर होतात. जेलिफिशचा डंक शरीराला इलेक्ट्रिक शॉक लागल्या सारखा असतो. त्यामुळे वेदना होऊन सर्वत्र खाज सुटते. अशी माहिती व्यवसायिक देत आहेत.

## लहान मुलांच्या आजारावरील उपचारांसाठी हे सेमिनार उपयुक्त : ना.आदिती तटकरे

आहे, असे बोलून त्यांनी बालकांचे कुपोषण कसे दूर करता येईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे. या सेमिनारच्या माध्यमातून कुपोषणासारख्या समस्येवर दीर्घकालीन उपाय सुचविल्यास संपूर्ण राज्याला याचा उपयोग होईल,अशी आशा व्यक्त केली.

रायगड जिल्ह्यासाठी शंभर बेड्ससह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर झाले आहे. या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे जिल्ह्यातील मुलामुलींना वैद्यकीय शिक्षण व पदवी प्राप्त होण्यास तसेच जिल्ह्यातील नागरिकांना आवश्यक आरोग्य सोयी सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. यासाठी पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या अत्यंत महत्वपूर्ण योगदानाबद्दल सर्व डॉक्टरांनी पालकमंत्री कु.तटकरे यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव केला व त्यांचे विशेष आभारही मानले.

## आगरी समाजासाठी प्रतीक जुईकर हे प्रतिबिंब ठरले आहेत : कपिल पाटील

आणि गोडवा देणारा म्हणून या समाजाची ओळख आहे हे आपल्याला नवी दिल्लीत दिसून आले आहे.स्वातंत्र्य चळवळीत अग्रेसर असलेल्या कर्जत तालुक्यातील हिराजी पाटील हे देशातील आगरी समाजाचे पहिले हुतात्मे ठरले आहेत.त्यामुळे प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व या भूमीत जन्माला आले असून आपण आजच्या कार्यक्रमाला मंत्री आणि पक्षाचा कार्यकर्ता म्हणून आलो नाही तर समाजाचा समाज घटक म्हणून आलो आहे.शिक्षणात आपला समाज मागे होता,पण आता प्रतीक जुईकर यांनी समाजाचा दुसरा आणि रायगड जिल्ह्यातील पहिला थेट आयएएस बनून आमच्यासाठी अभिमान वाटावा अशी कामगिरी केली आहे.शिक्षणात बनलेले हे आमूलाग्र बदल समाजाने स्वीकारले आहेत याचा अभिमान असल्याने आपल्या समाजासाठी थेट आयएएस बनलेले प्रतीक जुईकर हे समाजाचे प्रतिबिंब ठरले असून भविष्यात आपल्याला डॉ रवींद्र शिसवे यांच्यानंतर अनेक वर्षांनी आयएएस बनलेले प्रतीक जुईकर यांनी परंपरा निर्माण केली आहे.ही परंपरा आता

आम्हाला मोजता आले नाही पाहिजे एवढे आयएएस आयपीएस अधिकारी समाजात बनले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. आज आपण पाहुणे म्हणून आलो आहोत,पण प्रतीक जुईकर हे कधीही माझ्या खुर्चीवर प्रमुख पाहुणे म्हणून बसू शकतात, पण मी आयएएस बनू शकत नाही हा प्रशासकीय अधिकारी यांच्यात फरक आहे असे मत कपिल पाटील यांनी मांडले.प्रतीक जुईकर यांनी आपल्या सर्वांसमोर आदर्श ठेवला आहे ,तो आदर्श समोर बसलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे.कारण माझ्यासमोर बिहार,उत्तर भारतातील आयएएस अधिकारी माझ्यासमोर नवी दिल्लीत आले आहेत,आगदी काळात दिल्लीत देखील आगरी समाजाचे अधिकारी दिसतील असा आशावाद व्यक्त केले.त्यामुळे अशी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्याला सर्वांना संघटित राहिले पाहिजे आणि मधमाशी साठी चिकटून राहून यश संपादन करावे आणि त्यासाठी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेने स्पर्धा परीक्षा यांची तयारी साठी केंद्र सुरू करण्याचे आवाहन केले.या केंद्रासाठी आवश्यक सर्व मदत करण्याचे आश्वासन कपिल पाटील यांनी केले.

## पनवेल-प्रयागराज सुपर फास्ट रेल्वे सेवा २९ नोव्हेंबर पासून सुरू होणार

२ तृतीय वातानुकूलित, ७ द्वितीय आसन श्रेणी, ११ शयनयान श्रेणी (स्लीपर कोच) अशी पुर्णतः आरक्षित व्यवस्था आहे. या गाडीत कन्फर्म तिकिट असणाऱ्यानांच व कोविड १९ नियमांचे पालन करणाऱ्या प्रवाशांनाच प्रवेश आहे. हे लक्षात घेऊन प्रवाशांनी या रेल सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवासी संघाने केले आहे. या सेवेमुळे कोकण, नवी मुंबई, उत्तर महाराष्ट्र, खानदेश या मधील सर्व प्रवाशांची चांगली सोय झाली आहे.

## म्हसळा अ.नि.स.शाखेचा संविधान बांधिलकी महोत्सव २०२१ संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र अंनिस शाखा म्हसळा कडून संविधान बांधिलकी महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. २६ नोव्हेंबर संविधान दिन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा म्हसळा जि. रायगड यांच्या वतीने संविधान गौरव परीक्षा व चमत्कार सत्यशोधन कार्यक्रम च्या माध्यमातून साजरा करण्यात आला.



न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज म्हसळा येये जिल्हा कार्याध्यक्ष विनयकुमार सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपस्थितीत म्हसळा शाखा माजी अध्यक्ष व विद्यमान सल्लागार प्रा. शेख एम.ए. यांचे सविधानिक अधिकार व आपन या विषयावर व्याख्यान झाले तर ३१० विद्यार्थांनी एकाच वेळी संविधान गौरव परीक्षा च्या माध्यमातून संविधान बांधिलकी महोत्सव ला प्रारंभ केला. या कार्यक्रमाला न्यु इंग्लीश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज म्हसळा चे चेअरम समीर बनकर, प्राचार्य मोरे सर, प्रा. देवगावकर, प्रा. गावित, प्रा. चव्हाण, प्रा. खुताडे, प्रा. लोणशीकर, प्रा. महाजन आदि मान्यवर, शिक्षक विद्यार्थी उपस्थिती होते.

ग्रुप ग्रामपंचायत मादाटणे येथे विनयकुमार सोनवणे, प्रा. शेख एम. ए. व म्हसळा शाखा सचीव रुपेश गमरे यांच्या उपस्थितीत संविधान गौरव परीक्षा घेण्यात आली व संविधानिक मूल्य या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

दुपारी २ ते ५ या वेळेत प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी ची माध्यमिक शाळा पाष्टी येथे 'माझे संविधान माझा अभिमान ' अंतर्गत स्पर्धे चे पारितोषिक वितरण जिल्हा कार्याध्यक्ष विनयकुमार सोनवणे व प्रा.शेख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी म्हसळा शाखा प्रधान सचिव रुपेश गमरे यांनी विविध चमत्कार सादरीकरण करुन त्यामागील विज्ञान व हातचलाखी व संविधानातील वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट करुन सांगितले.

या वेळी घेण्यात आलेल्या संविधान गौरव परीक्षा मध्ये ७० विद्यार्थांनी सहभाग घेतला काल म्हसळा तालुक्यात माध्यमिक शाळा मेदडी, माध्यमिक शाळा संदेरी, माध्यमिक शाळा पाष्टी, ज्युनिअर कॉलेज म्हसळा, माध्यमिक शाळा बदरकाठा, माध्यमिक शाळा तळवडे, माध्यमिक शाळा गोरेगाव , एकूण ५ प्राथमिक शाळा, मादाटणे व आबेत विहार, अश्या जवळपास १५ केंद्रावर ६५० विद्यार्थांनी महा. अंनिस म्हसळा शाखा च्या माध्यमातून संविधान गौरव परीक्षा मध्ये सहभाग घेतला. या संविधान बांधिलकी महोत्सवात पुढील दोन महिने अजून अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम कार्यक्रम यांचे आयोजन करणार आहोत. व संविधान साक्षरता मोहिम राबवणार असल्याचे प्रधान सचीव रुपेश गमरे यांनी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## कु.स्नेहल शत्रुघ्न माळी हिने आंतरराष्ट्रीय सायकलिस्टमध्ये पटकाविले सुवर्णपदक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दि २५ ते २९ नोव्हें २०२१अशी २६वी राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा करूक्षेत्र हरीयाणा येथे सुरू असुन यात भारतभरातून प्रत्येक राज्याचे विजेते सहभागी झाले असुन त्यात महाराष्ट्र कडुन नवी मुंबई ची स्नेहल शत्रुघ्न माळी हिने सबज्युनिअर गटात ३० घा अटीतटीच्या स्पर्धेत पहिला क्रमांक मिळवत सुवर्ण पदक मिळवले असुन प्रथमच महाराष्ट्राला हे पदक मिळाले आहे .



सदरच्या स्पर्धेत भारतभरातून ४२ स्पर्धक सहभागी झाले होते त्यात,अनेक राष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग क्लब चे राज्यस्तरीय विजेते हे त्याचे राज्यातून विजेते हे सहभागी झाले होते करूक्षेत्र येथील या स्पर्धेत रेकॉर्ड करीत स्नेहल शत्रुघ्न माळी रा खारघर हिने सोनी स्पिंग क्लब चे आंतरराष्ट्रीय सायकलिस्ट राजेंद्र सोनी यांचे मार्गदर्शनाखाली सुवर्ण पदक महाराष्ट्राला मिळून दिले आहे येणारे काळात स्नेहल ही भारताकडुन आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायकलिंग स्पर्धेत भारताच प्रतिनिधित्व करणार आहे.

# ई - रिक्षासाठी अश्वपालकांचा सकारात्मक दृष्टीकोन! व्यापारी वर्गात आनंदाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान मध्ये आजपर्यंतच्या कार्यकाळात पर्यटकांना वाहतुकीसाठी हातरीक्षा आणि घोडे हीच वाहने वापरली जात आहेत. परंतु जग एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना याच ठिकाणी अद्याप वाहतुकीच्या सुविधेत काहीच बदल घडवून आणला गेला नव्हता त्यातच अत्यंत कष्टदायक श्रम करणाऱ्या हातरीक्षा चालकांची या गाड्या ओढताना खूपच दमछाक होत असते. त्यांना या अमानवीय प्रथेतून कायमस्वरूपी मुक्ती मिळावी आणि याच माध्यमातून इथे पर्यावरण पूरक ई-रिक्षा सुरू झाल्यास निसर्गाच्या पर्यावरणाचा समतोल राखला जाऊ शकतो. जंगलाचे संवर्धन होण्याची गरज असताना आणि इथे फिरावयास येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना सुध्दा मनमोकळे पणे फिरता यावे यासाठी आता इथे वाहतुकीसाठी ई -रिक्षा हाच एकमेव पर्याय उपलब्ध राहिला आहे याकामी हातरीक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदेंनी मागील दहा वर्षांपासून शासन दरबारी पाठपुरावा सुरू केला आहे आणि त्यातूनच आता या महत्वकांक्षी प्रकल्पाला शासनाकडून जवळजवळ हिरवा कंदील मिळालेलाच आहे. त्यामुळे अल्पावधीतच इथे पर्यटकांच्या सेवेसाठी ई रिक्षाची सुविधा उपलब्ध होणार आहे या सुविधेमुळे कुणाच्याही व्यवसायावर परिणाम होणार नाही याची काळजी घेतली जात असल्याने आता मूळवासीय अश्वपाल संघटनेचे उपाध्यक्ष संतोष आखाडे यांनी नुकताच दि. २२ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी रायगड यांना निवेदन सादर करून ईथल्या एकूण ४६० घोडे आणि ९४ हातरीक्षा यांनाच यामध्ये सामावून घेण्यात यावे.

अन्य कुणालाही सहसा प्राधान्य देण्यात येऊ नये.अन्यथा कुणीही हॉटेल धारक खाजगी स्वरूपात या रिक्षा आणू शकतात त्यामुळे इथल्या ई रिक्षा चालकांच्या व्यवसायावर भविष्यात विपरीत परिणाम होऊ शकतो. या रिक्षांची संख्या सुध्दा मर्यादित ठेवण्यात यावी जेणेकरून ध्वनी प्रदूषण होणार नाही, कुठेही पार्किंगची समस्या उद्भवणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे असे दिलेल्या निवेदनात संतोष आखाडे यांनी नमूद केले आहे. मुळवासी अश्वपाल संघटनेच्या निर्णयाचे सर्वच स्तरांतुन स्वागत होत आहे.

एमएमआरडीए यांच्या माध्यमातून उत्तम प्रकारे क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात येत आहेत त्यामुळे रस्त्यावर आपसूकच स्वच्छता राखली जाणार आहे कुठल्याही प्रकारच्या दुर्गंधीचा अथवा धुळीचा त्रास सोसावा लागणार नाही.या धुळीमुळे मालाचे नुकसान होणार नसल्याने ई - रिक्षा सारखी विकसनशील साधने माथेरान मध्ये सुरू होणे ही काळाची गरज बनलेली आहे.आम्हाला काहीही करून आता इथे बदल हवा आहे. यासाठी जे साथ देतील त्यांना सोबत घेऊन आणि जे कुणी नसणार त्यांच्या शिवाय ही वाहतुकीची सुविधा उपलब्ध करणे आता शासनाच्या सकारात्मक प्रतिसादामुळे सहज शक्य होईल यात शंकाच नाही.

**ज्ञानेश्वर बागडे, व्यावसायिक माथेरान**

सुनील शिंदेंनी ई रिक्षा सुरू व्हावी यासाठी पाठपुरावा करत आहेत अशा महत्वाच्या प्रत्येक चांगल्या कामात अडथळे हे येत असतात,आणि याचा माथेरानकरांना चांगलाच अनुभव आहे.त्यामुळे शिंदेंनी ह्या अडथळ्यांची पर्वा न करता हे प्रयत्न चालू ठेवा,तुमच्या कार्याला नक्कीच यश येणार,ज्यांना पर्यटन क्रांती हवी आहें अशा सर्व माथेरानकराचा यास पूर्णपणे पाठींबा राहणार आहे.शासनाने लवकरच इथे ई रिक्षा सुरू करून या गावाच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा.

**निखिल शिंदे, लॉज धारक माथेरान**

माथेरान शहरात पर्यटकांकरिता दळणवळण सुविधा देण्याकरिता ई रिक्षा लवकरच सुरू होणार आहे ही खरोखरच आनंदाची बाब आहे. शासकीय रस्त्यावर इ रिक्षाला परवानगी देण्यात येणार आहे असे समजते परंतु येथील गरीब लोकांचा उदरनिर्वाह हा पर्यटकांवर अवलंबुन आहे तो आबाधित राहण्याकरता आपण येथील परवानाधारक रिक्षा व घोडेवाले यांनाच इ रिक्षासाठी प्राधान्य देण्यात यावे या व्यतिरिक्त हॉटेल व्यावसायिक किंवा खाजगीकरण होणार नाही याची काळजी घ्यावी.

**राकेश कोकळे, अध्यक्ष धनगर समाज तथा अश्वपालक माथेरान**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल श्री.सतीशचंद्र केसरवानी राहणार : ४०५, फेअर गार्डन, आझाद लेन, अंधेरी (प) मुंबई ५८ यांना फाईल नं.७३६, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.३५ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड शेतकरी यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक ७३६ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ३५ | ४0.00 चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकत आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९४१६४८३**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, श्री.निलकंठ जगन्नाथ कोळी रा.कोंबडभुजे, पोस्ट उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. त्याप्रमाणे वर नमूद शेतकरी खाली वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा / हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक KOM-ICIG-64**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वहाळ) | २५ ए | ३२ | १४0.00 चौ.मी. पैकी ५0 टक्के अविभाज्य भाग |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९४१६४८३**

कोर्ट-मा.श्री.आर.एस.भाकरे

ॲड.आदर्श दिवाणी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया.क.स्तर यांचे समोर पनवेल

दि.चौ.अर्ज नं.१५९६/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/१/२०२२

श्री.रितेश अरविंद पटेल व इतर — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.श्री.अरविंद नारायण पटेल हे दि.२१/०८/२०२० रोजी मुंबई येथे मयत झाले आहेत. कै. श्री.अरविंद नारायण पटेल यांचे मृत्यू पश्चात अर्जात नमूद केलेल्या मिळकत हे त्यांच्या वारसांची नावे रितेश अरविंद पटेल, हिना अरविंद पटेल, भाविका संजय पटेल आणि अवनी मार्मिक पटेल सदरच्या अर्जात दिलेली आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**दुकान नं.३, तळमजला, सिंग्नेचर पॉईंट बिल्डींग,**
**प्लॉट नं.५८, ५९, ६0, सेक्टर-१८, खारघर, पनवेल, जिल्हा : रायगड**

वरील अर्जदार हे कै.श्री.अरविंद नारायण पटेल यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.अरविंद नारायण पटेल यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल. तारीख माहे २२/११/सन २०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# २६/११ हल्ल्यातील जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जसखार येथील श्री रत्नेश्वरी देवीच्या मंदिर-ाखाली असलेल्या हॉल समोर युवा सामाजिक संस्था जसखार आणि झेप सामाजिक संस्था नवी मुंबई यांच्या वतीने २६/११ च्या हल्लयात देशासाठी बलिदान दिलेल्या शहिदांना आणि बळी पडलेल्या निरापराधांना भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी झेप सामाजीक संस्था नवी मुंबईचे अध्यक्ष-सुविधा वैती,उपाध्यक्ष अनिल भोईर, सचिव स्मिता भोईर, सहसचिव प्रशांत हुमणे, खजिनदार मोरेश्वर वैती, सदस्य-संस्कृती कळंबे, प्रगती हुमणे तसेच युवा सामजिक संस्था जसखारचे अध्यक्ष - हर्षल ठाकूर, खजिनदार-रणजीत पाटील, सेक्रेटरी-गिरीश मोकळ, सदस्य नितीन पाटील, मेघनाथ ठाकूर, रत्नेश्वरी कलामंचचे नृत्य दिग्दर्शक सचिन ठाकूर, सेक्रेटरी-हितेश तांडेल तसेच इतर सदस्य यावेळी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल श्री.सतीशचंद्र केसरवानी राहणार : ४०५, फेअर गार्डन, आझाद लेन, अंधेरी (प) मुंबई ५८ यांना फाईल नं.३१६, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.३६ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको अंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्याकडून खालील वर्णन केलेला भूखंड शेतकरी यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**

**सिडको फाईल क्रमांक ३१६ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ३६ | ४0.00 चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकत आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८८७९४१६४८३**

मा.श्री.सोनावणे साो.यांचे कोर्टात

ॲड.रेखा होवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया.क.स्तर यांचे समोर पनवेल

दि.चौ.अर्ज नं.१४३१/२०२१
ने.ता.१४/१२/२०२१

१) कुमारी सतलज बापू गवळी
२) अनिकेत बापू गवळी
रा.पी.एल.५/३/७, जीवन सागर असोसिएशन,
सेक्टर-१७, पनवेल
३) अर्चना बापू गवळी
रा.रु.नं.१, जीवन सागर असोसिएशन, सेक्टर-१७, पनवेल — अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.बापू विठ्ठल गवळी हे दि.२२/०६/२०२१ रोजी कामोठे येथे निधन पावले आणि अर्जदार नं.१ व २ ही मुले आहेत आणि अर्जदार नं.३ ही पत्नी आहे आणि यांनी त्यांचे खालील मिळकतीबाबत प्रोबेट दाखला मिळवणेसाठी अर्ज दाखल केला. मिळकतीचे वर्णन :-

**SCHEDULE OF PROPERTY**

Name of the property Holder deceased : Late Mr.Bapu Vithal Gavali

3) PL 5/3/7, Jivan Sagar, Association, Sector-17, Panvel

4) Gratuity, provident fund, pension

यासाठी वारस दाखला मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्या. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.
दि.२७/११/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# रोहा आगारातून एस.टी अखेर धावली ; सामान्य प्रवाशांत समाधान

**दै.रायगड नगरी । रोहा**

एस.टी. महामंडळाचे राज्य सरकारमध्ये विलिनीकरण व्हावे ही प्रमुख मागणी व इतर मागण्यांसाठी दि. ८ नोव्हेंबरपासून एस. टी. कर्मचाऱ्यांनी संपाच्या माध्यमातून आंदोलन पुकारले होते. या आंदोलनाचा तोडगा निघाला नसला तरी शासनाने केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत रोहा आगारातून रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात एस.टी. सेवा सुरु करण्यात आली असल्याची माहिती आगर प्रमुख सोनाली कांबळे यांनी दिली आहे. ग्रामीण भागात एस.टी सेवा सुरु झाल्याने समान्य प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

रोहा आगारामध्ये एकुण २४४ कर्मचारी असून त्यातील आतापर्यंत २५ कर्मचारी कामावर रुजू झाले आहेत. शुक्रवारपासून रोहा तालुक्यातील विरझोळी, नागोठणे, चणेर, कोलाड अशा फ़ेऱ्यांना सुरुवात झाली असून एस.टीच्या ४ वाजेपर्यंत एकून ५६ फ़ेऱ्या झाल्या आहेत. सदर एस.टी.वाहतूक सेवा रोहा आगारप्रमुख सोनाली कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु करण्यात आली आहे. जे कामावर आले त्यांना कामावर रुजू करण्यात आले असल्याची माहितीही कांबळे यांनी दिली. तसेच एस. टी. वाहतूक सेवेचा लाभ पूर्वीसारखे सर्व प्रवाशांनी घ्यावे असे आवाहनही कांबळे यांनी केले आहे. दरम्यान, ऐन दिवाळी सणात एस.टी कर्मचाऱ्यांनी संपाच्या माध्यमातून पुकारलेल्या आंदोलनामुळे सामान्य नागरिकांना खाजगी वाहतूक सेवेचा वापर करावे लागले. ज्यामुळे प्रवाशांना नाहक अतिरिक्त भुर्दड सोसावे लागले. आता एस.टी सेवा सुरु झाल्याने प्रवाशांनी समाधान व्यक्त करत सुटकेचा निश्वास सोडला आहे.



# सुरक्षा रक्षकाने केला दागिन्यांसह रोख रक्कमेचा अपहार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका सुरक्षा रक्षकानेच बंद घरातील रोख रक्कम व दागिने असा जवळपास २ लाख ३२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे. खारघर वसाहतीमधील सेक्टर २१ येथील ग्रामविकास भवन जवळ असलेल्या बन्सल हाऊसमधील सदस्य कुलविंदरसिंग बन्सल व इतर कुटुंबिय घराबाहेर कार्यक्रमानिमित्त गेले असताना त्यावेळी सुरक्षा रक्षकाने घरातील रोख रक्कम व दागिने असा जवळपास २ लाख ३२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

राव साहेब

ॲड.रेखा होवाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्याया.व.स्तर यांचे समोर
वारसाचे सर्टीफिकेट मिळणेबाबत अर्ज

अर्ज नंबर १७२०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०१/२०२२

१) दिपीका मांगीलाल कोठारी
वय : ३३ वर्षे, धंदा : घरकाम
२) विमला मांगीलाल कोठारी
वय : ३७ वर्षे, धंदा : घरकाम
रा.प्रतिक गार्डन, बी-५०१, से-३४,
कामोठे, जिल्हा : रायगड — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.फेनादेवी मांगीलाल कोठारी
वय : ५८ वर्षे, धंदा : घरकाम
रा.प्रतिक गार्डन, बी-५०१, से-३४,
कामोठे, जिल्हा : रायगड — सामनेवाला

ज्यापेक्षा कै.मांगीलाल भंवरलाल कोठारी ह्यांचा मृत्यू दि.१०/०१/२०२० रोजी मुंबई येथे झाला. अर्जदार ह्या कै.मांगीलाल भंवरलाल कोठारी यांच्या मुली आहेत व सामनेवाला ही पत्नी आहे आणि त्यांचे वारसाने खालील मिळकती बद्दल वारस दाखला मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

Name of the Property Holder : Late Shri.Mangilal Bhanwarlal Kothari

1) Flat No.501, Plot No.153 to 165 Sector-34, Village Kamothe, Building known as Pratik Garen" Tal-Panvel, Dist-Raigad admeasuring area 597 Sq. Ft, Agreement value Rs.41,99,485/- (Forty one lakhs ninety nine thousand four hundred and eighty five only) (1/2 Share)

2) Shop No.10, Plot No.53 & 54, Situated at sector-34, Kamothe Building known as Space Heights" admeasuring area 315 sq.Ft agreement value of Rs.8,00,000/- (Eight lakh only) (1/2 share)

3) Flat No.702, 7 th floor, Plot No.158, Sector-17, Building known as Shreeji castle, situated at Ulwe, Taluka-Panvel, Dist-Raigad area 53.33 Sq.mtrs Total Value Rs.21,52,020/- (Rupees-twenty one lakhs fifty two thousand twenty rupees only)

यासाठी वारस दाखला मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्या. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्याचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल. तारीख २७ माहे ११ सन २०२१.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, पनवेल**

राव साहेब

अर्जदारांकरिता ॲडव्होकेट : ॲड.उदय प्र. मोकल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६११/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२२

(कै.अर्चना अजित सामंत यांचे कायदेशीर वारस)
१) श्री.परिक्षीत अजित सामंत (मुलगा)
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
आधार कार्ड नं. ४४०१३१५८२९९७
२) श्री.संदीप अजित सामंत (मुलगा)
वय : ४१ वर्षे, धंदा : नोकरी
आधार कार्ड नं. ७०८९१५९५९०४२
अर्जदार १ व २ राहणार
रा.फ्लॅट नं.अे/२/२०३, अंबिका पार्क, सेक्टर नं.६,
नवीन पनवेल-४१०२०६, पनवेल, जि.रायगड
३) सौ.निलम अल्फ्रेड मोरेरा (मुलगी)
वय : ४५ वर्षे, धंदा : नोकरी
आधार कार्ड नं. ८०२३२५३९३८९१
रा.फ्लॅट नं.रुम नं.४, न्यू बॉईज हॉस्टेल,
बार्नेस स्कूल देवळोली, नाशिक ४२२४०१ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जााहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. अर्चना अजित सामंत यांचे निधन दि.१५/०५/२०२१ रोजी मुंबई झालेले आहे.

कै.अर्चना अजित सामंत यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै. अर्चना अजित सामंत कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.अर्चना अजित सामंत नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित सदनिका खरेदी केलेला आहे.

३) अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.अर्चना अजित सामंत व संदीप अजित सामंत यांनी नवीन पनवेल, पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित सदनिका खरेदी केलेल्या आहेत.

**मालमत्तेचे वर्णन**
**मिळकत क्रं.१ : सदनिका**
**मौजे : नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्रं. : अे/२०३**
**मजला : दुसरा**
**अंबिका को.ऑ.हौ.सोसायटी,**
**सेक्टर ६, प्लॉट नं.१**
**क्षेत्रफळ : ७१०.५ स्क्वे.फूट**
**मिळकत क्रं.२ : सदनिका**
**मौजे : नवीन पनवेल (प.), ता.पनवेल, जि.रायगड**
**सदनिका क्रं. : ७०३**
**अे विंग**
**मजला : सातवा**
**साईशरण को.ऑ.हौ.सोसायटी**
**सेक्टर ८, प्लॉट नं.१५**
**क्षेत्रफळ : ४०८ स्क्वे.फूट**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कै.अर्चना अजित सामंत यांच्या हिश्श्यात अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरीलप्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/११/२०२१

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# सरकारी अधिकाऱ्यांच्या उदासीनतेने कोकणच्या विकासाची गती मंदावली : मा. खा.हुसेन दलवाई

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोकणच्या प्रश्नावर सरकारी अधिकारी उदासीन असल्याने कोकणच्या विकासाची गती मंदावली असल्याचे मत मा. खा.हुसेन दलवाई यांनी व्यक्त केले. कोकणच्या विकासासाठी सर्वानी एकत्र येऊन काम करणे काळाची गरज असल्याचे आवाहन दलवाई यांनी केले. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी शेतकी विषयावर मार्गदर्शन परिषदेचे आयोजन केले होते यावेळी दलवाई बोलत होते .



रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक पद्धतीने तंत्रज्ञान वापरून फायद्याची शेती करण्यासाठी महाराष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत मोकल यांनी पुढाकार घेत कृषी विषयक प्रदर्शन भरविले असून यावेळी शेती तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या शेती विषयक प्रदर्शनात कृषी, फलोत्पादन, सिंचन, प्रक्रिया, दुग्धविकास पशुसंवर्धन, शीतगृह व गोदाम, फळपिक विमा सेंद्रिय औषधे, खते, रासायनिक औषधे, सौरऊर्जा, ठिबक तुषार संच, कृषी अवजारे च्या प्रदर्शनाला जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. आपल्या विस्तृत भाषणात हुसेन दलवाई म्हणाले की कोकणचा प्रश्न असला की मला एक गोष्ट अत्यंत दुःख आहे की सरकारी अधिकारी यांची अनास्था असून त्यामुळे या कोकणच्या विकासाला गती मिळत नाही. कोकण च्या नागरिकांनी एकत्र येत सर्वांना पुढे घेऊन जाण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन दलवाई यांनी केले. कोकणात रासायनिक कंपन्यांमुळे येथील शेत जमिनीचा कस बिघडला असून उत्पादन बिघडले आहे. विमा कंपन्यांनी गेली पाच वर्षे सतत आंब्याचे नुकसान झाले आहे. काजु चे उत्पादन कमी झाले आहे. काजु प्रक्रिया करणारे उद्योग केरळ मध्ये आहेत. नद्यांमध्ये गाळ साचलेला असून त्याची साफसफाई झाली पाहिजे. मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याने पाणी घरामध्ये येत आहे. डोंगर फोडल्यामुळे आता डोंगराची माती पावसामुळे घरात घुसले आहे. गाळ काढण्याचे काम गेले दहा वर्षांपासून मी मागणी सरकार कडे करत आहे.

मुंबई गोवा महामार्ग गेली ११ वर्षांपासून सुरू असून तो अद्याप पूर्ण झाला नाही. त्यावर कोकणी माणूस काहीच बोलत नाही. कोकणातील जिल्हा परिषद शाळांची अवस्था बिकट झाली असून खासगी शाळा सुरू आहेत. शिक्षक आपले पणाने शिकवीत नाही त्यामुळे आता मुलांना वाचताही येत नाही. सध्याच्या वस्तुस्थिती मध्ये अजूनही जाती व्यवस्था सुरू असून त्यामुळे आजही जाती पातीचे राजकारण समाजात सुरू आहे. शिवाजी महाराजांनी सर्व धर्म समभाव मानत सर्वांना आपल्याबरोबर घेऊन राज्य केले त्यामुळे त्यांना जनतेचा राजा म्हणतात. रायगड जिल्ह्यात ३५००० हेक्टर शेत जमीन ही खार जमीन झाली आहे. येथे बारमाही शेती झाली पाहिजे यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

याठिकाणी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य ते सिंचन करणे गरजेचे असून डोंगरावरील पडणारे पाणी जमिनीत कसे जमा होईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. २०३० मध्ये हवामान बदलामुळे मोठे बदल होणार आहेत. त्यामुळे पुढील पिढीला होणारे परिणाम रोखण्यासाठी आजच उपाय करणे गरजेचे आहे. आज ३ फुटापर्यंत जमा होणारे पाणी नंतर ६ फुटांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. येथील शेतकऱ्यांनी गाई म्हशी यांचे पालन करून दुग्धव्यवसाय, देशी कोंबड्यांचे कुक्कुट पालन, शेळी पालन, मेंढी पालन इत्यादी अनेक जोडधंदा करणे आवश्यक आहेत. रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी येथे मच्छी साठी शीतगृह लवकरात लवकर उभारण्यात यावे यासाठी सरकारने प्रयत्न करणे खूपच गरजेचे आहे. शीतगृह असल्याने बारमाही आंबा मिळणार असल्याने आंबा उत्पादकांना नक्कीच फायदा होणार आहे.

पुराचा प्रश्न, हवामानाचा प्रश्न, शेतकऱ्यांचा प्रश्न, पर्यटकांचा मिळणाऱ्या अपुऱ्या सुविधा, खराब रस्त्याचा प्रश्न या सर्व प्रश्नांना सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करणार. ' असे यावेळी श्री . हुसेन दलवाई मा . खासदार यांनी सांगितले. ' कोकणातील शेतकरी हा गेल्या दोन वर्षापासून वेगवेगळ्या परिस्थितीचा सामना करत आहे. त्यात निसर्ग वादळ, तोक्ते वादळामुळे येथील आंबा उत्पादन कमी झाले आहे. सध्या हवामान बदल होत असल्यामुळे आंब्याचा मोठा मोहोर गळून गेला आहे. ज्याठिकाणी करोडो रुपयांचे आंबे येत असलेल्या ठिकाणी आता फक्त २५ ते ३० लाख रुपयांचे आंब्याचे उत्पादन मिळाले आहे. आज ग्लोबल वॉर्मिंग मुळे देशातील शेतकऱ्यांना हवामान बदलाचा परिणाम सहन करावा लागत आहे. पाण्याचे योग्य ते सिंचन करून त्याचा वापर करणे गरजेचे आहे. आंबा उत्पादन झाल्यावर त्यावर प्रक्रिया करणे अत्यंत गरजेचे असून कोकणात हाताच्या बोटावर मोजण्या एवढे प्रक्रिया करणारे उद्योग आहेत. प्रक्रिया करणारे उद्योग वाढणे गरजेचे आहे.

## संक्षिप्त...

### रोहे तालुक्यातून आळंदीकडे चार पायी वारी दिंड्यांचे प्रस्थान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कार्तिक कृ.सप्तमी ते कार्तिक कृ.त्रयोदशी संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळ्याचे आयोजन आळंदी येथे करण्यात आले आहे .या संजीवन समाधी सोहळ्यासाठी संपूर्ण राज्यभरातून मोठ्या संख्येने पायी दिंड्या आळंदीकडे रवाना होतात. तर रोहे तालुक्यातुन देखील या सोहळ्यासाठी चार पायी दिंड्यांचे प्रस्थान दि.२२ नोव्हेंबर पासून आळंदीकडे झाले आहे. स्वा. सु. गुरूवर्य अलिबागकर महाराज यांच्या तसेच धोंडू महाराज कोलाटकर व गोपाळ महाराज वाजे यांच्या प्रेरणेने संपूर्ण रोहे तालुक्याला वारकरी संप्रदायाची फार मोठी परंपरा लाभली आहे. या चार पायी दिंड्यांध्ये संत ज्ञानेश्वर महाराज सत्संग वारकरी सेवा संप्रदाय मंडळ, संभे (रोहे) ते आळंदी ही दिंडी रायगड भूषण ह.भ.प.नारायणमहाराज दहिंबेकर व ह.भ.प.नारायणमहाराज महाबळे यांच्या नेतृत्वाखाली व रोहे-नागोठणे ते आळंदी ही दिंडी ह.भ.प.मारूतीमहाराज कोलाटकर, रायगड भूषण ह.भ.प.दळवी महाराज (गुरूजी),बाळाराम महाराज शेळके, ह.भ.प.नामदेव महाराज यादव यांच्या नेतृत्वाखाली तर रोहे ते आळंदी कोकण दिंडी रोहे ही दिंडी रायगड भूषण ह.भ.प.रायगड भूषण पुरुषोत्तम महाराज पाटील व भाऊमहाराज दळवी यांच्या नेतृत्वाखाली तर पुगांव येथून पद्मनाभ सांप्रदाय, अमृतनाथ स्वामी श्री. दत्त मंदिर पुगांव गोपाळ चव्हाण, दत्तू पवार,जगदीश तवटे,बाळकृष्ण धावडे,किरण कुंभार यांच्या नेत्रुत्वाखाली अखंड हरिनामाचा गजर करीत आळंदी कडे मार्गस्थ झाल्या आहेत. या तिन्हही दिंड्यांध्ये संपूर्ण तालुक्यातून व तालुक्याचे आजूबाजूचे गावातील शेकडोंच्या संख्येने भाविक भक्त व भगिनी सहभागी होण्याची फार मोठी परंपरा आहे.अखंड हरिनामाचा व ज्ञानोबा माऊली तुकारामाचा जयघोष करीत या दिंड्या आळंदीकडे मार्गस्थ झाल्या आहेत.

### मतीमंद मुलीच्या नातेवाईकांचा पोलीस करतात शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका मतीमंद महिलेच्या नातेवाईकांचा शोध सीबीडी पोलीस करीत आहेत. सदर महिलेचे नाव रोहिणी कालिदास (२०) असे असून ती अंगाने सडपातळ, रंग काळा, चेहरा गोल, केस लांब, उंची ५ फूट, चेहऱ्यावर तीळ असून, अंगात ग्रे रंगाचा सलवार व लाल रंगाचा कुडता परिधान केला असून ती सायन-पनवेल हायवे रोडवर उरण फाटा ब्रीजजवळ पोलिसांना मिळून आली आहे.


**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## कर्जत कल्याण राज्य मार्गावर डिकसळ येथे उभारले थँक्यू आंबेडकर सेल्फी पॉईंट

**दै.रायगड नगरी । कर्जत**

संविधानदिनाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील डिकसळ येथील शांतीनगर येथील शांतिदूत मंडळाच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर याना अभिवादन करण्यासाठी थँक्यू आंबेडकर असा सेल्फी पॉईंट बनविण्यात आला आहे. मुंबई हायकोर्टाचे वकील गौतम गायकवाड़ यांचे हस्ते या सेल्फी पॉईंट चे लोकार्पण करण्यात आले.




शांतीदूत मंडळ डिकसळ शांतीनगर आयोजित भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला डिजिटल बॅनर चे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ॲड कैलास मोरे, सिद्धार्थ सदावर्ते, आकाश कांबळे, उमरोली ग्रामपंचायतच्या माजी उपसरपंच भारती पाटील, सदस्य तेजस भासे,एड उत्तम गायकवाड, रायगड भूषण किशोर गायकवाड, राजू चव्हाण, सचिन गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे उपासक रमेश गायकवाड, उपासिका हिराताई हिरे, शारदाताई वाघमारे, रेखा गायकवाड, संगीता गायकवाड, शोभा चव्हाण, तनुजा गायकवाड, मंडळाचे अध्यक्ष निखिल गायकवाड, सचिव प्रमोद वाघमारे, नितीन गायकवाड, प्रशिक गायकवाड, सागर ब्राह्मणे, मनोज गायकवाड, प्रमोद चव्हाण,विजय पवार, प्रणव गायकवाड,आदी उपस्थित होते.

## वेश्वी- आदिवासीवाडी मुख्य रस्त्याच्या नवीन साकव कामाचे भूमिपूजन संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

शनिवार दिनाकं २७ नोव्हेंबर २०२१ रोजी जिल्हा नियोजन निधीतून मंजूर करण्यात आलेल्या वेश्वी- आदिवासीवाडी मुख्य रस्त्याच्या नवीन साकव कामाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. आमदार नसतानाही माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांचा विकास कामाचा धडाका सुरूच आहे त्याबद्दल त्यांचे वेश्वी-आदिवासीवाडी ग्रामस्थांनी आभार मानले आहेत. या कार्यक्रमास उरण विधानसभा संपर्कप्रमुख महादेव घरत, वेश्वी सरपंच संदीप कातकरी,वेश्वी शाखाप्रमुख रवींद्र पाटील, दादारपाडा शाखाप्रमुख रमेश गोधळी, रायगडभूषण दत्ताराम गोधळी, प्रदीप मुंबईकर, प्रीतम मुंबईकर, माजी ग्रामपंचायत सदस्य परशुराम कातकरी, ग्रामसेवक ठाकूर मॅडम व ग्रामस्थ उपस्थित होते.

## रोहा पोलीस स्थानकात शहीदांना अभिवादन



**दै.रायगड नगरी । रोहा**

मुंबई येथे २००८ साली दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्लयात महाराष्ट्र पोलीस दलाचे अधिकारी व जवान शहीद झाले. त्यांचे स्मृति प्रीत्यर्थ हा दिवस महाराष्ट्रात शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो. यावर्षीच्या १३ व्या शहीद दिनानिमित्ताने रोहा पोलीस स्थानक आवारात उभारण्यात आलेल्या शहीद स्तंभावर रोहा पोलिसांकडून या वीरमरण पत्करलेल्या शहीद अधिकारी, जवानांना अभिवादन करण्यात आले. पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी स्तंभाला पुष्पमाला अर्पण करत अभिवादन केले. या वेळी कर्तव्यावर असलेले सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसह जिल्हा दक्षता समिती सदस्य आप्पा देशमुख, सिटिझन फोरम चे अध्यक्ष नितीन परब, पत्रकार राजेंद्र जाधव, अल्ताफ चोरडेकर,मनसे जिल्हा सचिव अमोल पेणकर , नितीश सकपाळ, महेश मोहिते, कोरोना योद्धा राजेश काफरे, अनंतराव देशमुख, संदेश मोरे, अनिल माळी आदी उपस्थित होते.

रोहा पोलीस स्थानकात या सर्व शहिदांची स्मृती कायम रहावी या साठी तत्कालीन पोलीस निरीक्षक अजिमुद्दीन मुल्ला यांचे संकल्पनेतून शहीद स्तंभ उभारण्यात आला आहे. स्तंभाला या दिनी पोलीस कर्मचारी, शहरातील नागरिक, पत्रकार यांचे उपस्थितीत अभिवादन करण्यात येते. त्याच परंपरेने शहीद दिना निमित्ताने अभिवादन करत स्तंभासमोर सर्व नतमस्तक झाले.

## माथेरान वाहनस्थळावर चोऱ्यांचे प्रमाण वाढले ! पर्यटकांमध्ये नाराजीचा सूर

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना येथील वाहनस्थळावर अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असून मागील काही दिवसांमध्ये येथील गाडीचे आरसे, अँटिना व पेट्रोल चोरीचे प्रमाण वाढल्याने येथील वाहनस्थळाचा सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे.

माथेरान मिनिट्रेन बंद असल्याने येथे येणाऱ्या पर्यटकांना नेरळ माथेरान घाटमार्गाचा वापर करावा लागत आहे. माथेरान शहरात इंधनावर चालणाऱ्या वाहनांना बंदी असल्याने सर्व वाहने ही येथील प्रवेशद्वार दस्तुरी नाका येथेच लावून पुढे गावामध्ये जावे लागते येथील वाहनस्थळावर वाहने उभी करण्यासाठी माथेरान नगरपालिका व वन संवर्धन समिती वेगवेगळे शुल्क आकारत असतात पण शुल्क आकारत असताना ते फक्त जागा वापराचे शुल्क आकारत असल्याचे सांगत असतात पण वाहनांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नाकारत असतात येथे पार्क केली जाणारी वाहने पर्यटकांनी स्वतःच्या जबाबदारीवर उभी करायची असा फलकच त्या ठिकाणी लावलेला आहे त्यामुळे त्याचा गैरफायदा घेताना मागील काही महिन्यांमध्ये वाहनातील



सामान, पेट्रोल,डिझेल चोरीचे प्रमाण वाढले आहे.

नुकतीच एमएमआरडीएच्या माध्यमातून येथील वाहनस्थळाचा सुशोभीकरणाचे काम करण्यात आले होते पण हे करताना येथे विजेची व्यवस्था नसल्याने सीसीटीव्ही कॅमेरे असूनही अंधारामध्ये काहीही दिसत नसल्याचे येथील कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे तसेच वाहनस्थळाला कुठेही कुंपण नाही त्यामुळे कोणीही कुठेही जाऊ शकते.

माथेरान मध्ये येणाऱ्या पर्यटकांना येथील वाहनस्थळावर प्रवेश करताच नकोसा अनुभव येत असतो सुट्ट्यांच्या दिवशी येथे वाहन लावण्यास जागा उपलब्द होत नसतात काहीवेळा त्यावरून खटकेही उडत असतात त्यातच पर्यटकांची गाडी येताच त्यास येथील घोडे व्यावसायिक,हमाली करणारे, रूम्स ची दलाली करणारे गराडा घालून पर्यटकांची दिशाभूल करीत असतात अनेकवेळा ह्या लोकांना पार्किंग मध्ये प्रवेश करण्यास मज्जाव केला असतानाही हे प्रकार सुरुच आहेत ह्यातील अनेक जण नवखे आहेत तसेच पार्किंगमध्ये रात्रीच्या वेळी पुरेशी सुरक्षा यंत्रणाच नाही त्याचाही फायदा हे भुरटे चोर घेऊन येथे पार्क केलेल्या दुचाकीमधून पेट्रोल चोरीत आहेत पेट्रोलचे दर वाढल्याने ह्या घटनांमध्ये अधिकच वाढ झालेली आहे ह्या ठिकाणी सुरक्षा यंत्रणा राबविणे गरजेचे असून त्यासाठी येथे पोलीस बंदोबस्त वाढविण्याची मागणी वन संवर्धन समितीने केली आहे.सुट्ट्याच्या हंगामात तसेच अन्य दिवशी सुध्दा याठिकाणी मोठया प्रमाणावर पर्यटकांची गर्दी होते त्यामुळे तेथे पर्यटकांची होत असणारी दिशाभूल आणि फसवणूक याला आळा घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने अधिक कुमक ठेवणे आवश्यक असल्याचे बोलले जात आहे.

# पोलादपूर महाड दरम्यान महामार्गावरील प्रवास खड्ड्यांमुळे मंद आणि कॉंक्रीटीकरणामुळे जलद

## वाया गेलेला वेळ भरून काढण्याचा प्रयत्न ठरतोय धोकादायक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६च्या चौपदरीकरणादरम्यान पोलादपूर ते महाडदरम्यानचा प्रवास हा खड्ड्यांमुळे कंटाळवाणा तर कॉंक्रीटीकरणाचा रस्ता सुरू झाल्यावर वाया गेलेला वेळ भरून काढण्याच्या प्रयत्नात जलद गतीने होत आहे. मात्र, हाच वाया गेलेला वेळ भरून काढण्याचा प्रयत्न जीवावर बेतणारा ठरत असल्याचे बुधवारी सकाळी तरूणाचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर स्पष्ट झाले आहे.

पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रमुख रस्ते यंदाच्या पावसाळ्यात जीर्णावस्थेत पोहोचले असताना तेथून मोटारसायकल व अन्य वाहनांतून महामार्गावर येऊन प्रवास करणाऱ्यांकडून वाहनाची गती वाढवून खड्ड्यांमुळें वाया गेलेला वेळ भरून काढण्याच्या प्रयत्नांत होणारे अपघात जीवघेणे ठरत आहेत. बुधवारी उमरठ येथील सर्वेश विश्वनाथ कळंबे हा २० वर्षीय तरूण लोहारमाळ येथील सोबती सिध्देश राजेंद्र नरे या १७ वर्षीय तरूणासोबत मोटारसायकलवरून महाडकडे आयटीआय प्रशिक्षण केंद्रामध्ये जात असताना इसाने कांबळे गावाच्या हद्दीमध्ये पुढे असलेल्या राहुल अशोक उतेकर या तुर्भे ता.पोलादपूर येथील तरूणाच्या मोटारसायकलच्या हॅण्डलला सर्वेश कळंबे याची मोटारसायकल धडकून वेगाने पुढे असलेल्या इनोव्हा कारच्या मागील भागावर आदळली. या अपघातामध्ये राहुल उतेकर याच्या मोटारसायकलवरील पोलादपूर तालुक्यातील तुर्भे गावठाण येथील अविनाश गोळे यांच्यासह राहुल उतेकर आणि सर्वेश कळंबे याच्या मोटारसायकलवरील लोहारमाळ येथील सिध्देश नरे आणि स्वत: सर्वेश असे चौघेजणही जखमी झाले. यामध्ये सर्वात जास्त जखमी अवस्था सर्वेश याची असल्याचे अपघातस्थळी दिसून आले.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर नियमित सेवाभावी वृत्तीने प्रवासी वाहतूक करणाऱ्या मिनीडोर चालक मालक संघटनेचे अध्यक्ष पार्टे यांनी मिनीडोरमधून या चारही जखमींना तातडीने महाड येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये उपचारासाठी नेले. यावेळी कोणतीही सरकारी अथवा राजकीय पक्षाची रूग्णवाहिका तातडीने उपलब्ध झाली नाही. उपचारादरम्यान गंभीर जखमा व दुखापती झालेल्या सर्वेश कळंबे याचा दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे खड्ड्यांमुळे वाया गेलेला वेळ भरून काढण्याच्या प्रयत्नांत झालेल्या अपघातामध्ये हकनाक बळी गेल्याचे उघड झाले आहे. पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण रूग्णालयामध्ये तातडीने उपचार होईल अशा सुविधा तसेच वैद्यकीय अधिष्ठाता नसल्याचे दिसून येत असताना महाड येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये देखील सर्वेश याच्या मृत्यूनंतर उपचारात हेळसांड झाल्याची नाराजी स्पष्ट झाल्याने पोलादपूर ते महाडदरम्यानच्या प्रवासामध्ये अपघात झाल्यानंतर दोन्ही शहरातील आरोग्य व्यवस्था कुचकामी ठरत असल्याची भावना संतप्त नातेवाईकांकडून उफाळून आली. यामुळे जोपर्यंत मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६चे काम पूर्ण होत नाही तोपर्यंत या महामार्गावरील खड्ड्यांप्रमाणेच गुळगुळीत कॉंक्रीटीकरणाच्या रस्त्यावरून संयमाने वाहने चालविण्याची गरज निर्माण झाली असून शासनाने याचदरम्यान महामार्गापासून जवळच असलेल्या पोलादपूर आणि महाड येथील ग्रामीण रूग्णालयांमध्ये अपघातांतील जखमींवर उपचार करण्याइतपत सुसज्जता आणण्याची गरज आहे.

